REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २१ मे १९४७ अंक २१

कंपनीच्या पहिल्याच वर्षीच्या ऊंसगाळणीस सुरुवात होऊन अद्यावत् पद्धतीचा एकजिनसी गूळ तयार होऊं लागला.

## पांडुरंग ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस व फॅक्टरी : पोस्ट–कुरोली, ( जि. सोलापूर )

अधिकृत भांडवल : रु. १०,००००० ( दहा लाख )
विक्रीस काढलेलें भांडवल : रु. ५,००००० ( पांच लाख )

पुढीलप्रमाणें—१०००—५ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकी रु. १०० चा. ६००० "बी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकी रु. ५० चा. १०००० "सी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकी रु. १० चा ( "सी" क्लासचे सर्व शेअर्स खपले आहेत. )

—शेअर्सची विक्री चालू आहे—

त्याच्या रकमा पुढीलप्रमाणें मागवयाच्या आहेत.

अर्जासोबत शेअर्सच्या ¼ व अर्जमंजुरीनंतर ¼ व उरलेली रक्कम प्रत्येक कॉलमध्यें तीन महिन्यांपेक्षा कमी अंतर नसलेल्या दोन हप्त्यांनीं.


★ कंपनीस मिरज ( ज्यु. ) दरबारनें १५ वर्षे इन्कमटॅक्स माफ केला आहे व इतर सवलती देऊन रु. २५,००० चे शेअर्स घेतले आहेत.

★ पहिल्याच वर्षी कंपनी १० टक्के डिव्हिडंड देण्याची हमी घेत आहे. शेअर–फॉर्म, माहितीपत्रकें याकरितां वरील पत्त्यावर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स : जे. व्ही. ताम्हनकर आणि कंपनी.

इन्फर्मेशन ऑफिसेस :

पुणें—लक्ष्मी रोड, गणपति चौक, बुधवार, नं. ६२, पुणें २.
पंढरपूर—नवी पेठ, पंढरपूर.



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## आरको

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

## विविध माहिती

**अमेरिकेंतील सोन्याचा सांठा**—इंटर नॅशनल मॉनेटरी फंडामुळें पत्कराव्या लागणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या संभाळून सुद्धा अमेरिकेंतील सोन्याचा सांठा गेल्या वर्षी ५ कोटी, ६२ लाख डॉलर्सच्या किंमतीनें वाढला. सध्या अमेरिकेंतील सोन्याचा सांठा २ खर्व, ८१ कोटी डॉलर्स किंमतीचा आहे. एक वर्षापूर्वी हाच आकडा २ खर्व, २४ कोटीपेक्षा थोडा अधिक होता.

**जर्मनीसाठीं अमेरिकेचा कापूस**—जर्मनीच्या कापसाच्या गरजेचा अंदाज घेण्यासाठी अमेरिकेंतील कापसाच्या व्यापारांतील तीन तज्ज्ञ जर्मनीला जाणार आहेत. जर्मनीला दर वर्षी ३ लाख गाठी कापूस खाजगी व्यापाराच्या मार्गानें निर्यात करण्याचा त्यांचा विचार आहे.

**हिंदुस्थानची चहाची निर्यात**—हिंदुस्थानांतून ४१ कोटी, १९ लाखांपेक्षा थोडा अधिक पौंड चहा निर्यात करण्याची परवानगी देण्यांत आली आहे. हिंदुस्थानांतून निर्यात होणाऱ्या स्टँडर्ड निर्यातीशीं हें प्रमाण १०८ टक्के पडतें.

**जागतिक बँकेकडून फ्रान्सला कर्ज**—इंटर नॅशनल बँकेकडून फ्रान्सला मिळावयाच्या २५ कोटी डॉलर्स कर्जाच्या करारावर नुकत्याच फ्रेंच प्रतिनिधी व बँकेचे प्रतिनिधी यांनीं सह्या केल्या; कर्ज ३० वर्षे मुदतीनें देण्यांत आलें असून व्याजाचा दर ३¼ टक्के आहे. या कर्जाचा उपयोग फ्रान्सच्या पुनर्घटनेसाठी करण्यांत यावयाचा असून मुद्दलाची फेड करण्यास १० वर्षांनंतर सुरवात होणार आहे.

**अणु बॉंबमुळें बोटी आरोग्याला घातक**—बिकिनी बेटाच्या आसपास नाविक दलावर अणुबॉंबचा काय परिणाम होतो तें पहाण्यासाठी प्रयोग करण्यांत आला त्याला आतां दहा महिन्यांच्या-वर काळ लोटला. परंतु या जहाजांवर रेडिअमचे परिणाम अजूनही आढळून येत असल्यामुळें तीं मनुष्यांना रहाण्यास पूर्ण निकामी झालीं आहेत. रेडिअमचे परिणाम नष्ट करण्यासाठी त्या बोटी आतां ओढून नेण्यांत येणार आहेत.

**हिंदुस्थानांतील क्षयरोगाचे बळी** — इंदूरच्या महाराजांनीं हिंदुस्थानांतील लोकांच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी डॉ. मायर या सुप्रसिद्ध अमेरिकन डॉक्टरची योजना केली होती. त्यांनीं आपली तपासणी पुरी केली असून इंदूरच्या महाराजातर्फे सार्वजनिक आरोग्य सुधारण्याचा एक कार्यक्रम ते आखीत आहेत. या सुधारणेच्या योजनेला २ कोटी डॉलर्स खर्च येईल. हिंदुस्थानांतील दारिद्र्य निर्मूल केल्याशिवाय रोगांची पिछेहाट करता येणार नाहीं असें डॉक्टरांचें मत आहे.

**चेक चोरून ते वटविणाऱ्या टोळीचा सुगावा**—पोष्टानें धाडलेले कांहीं चेक पत्रावरील पत्त्यास पोचत नाहींत; त्या चेकवरील नांव बदलून, रकम वाढवून परंतु सही कायम ठेवून आणि क्रॉसिंग खोडून व ऑर्डरचा चेक बेअरर करून ते चेक बँकांच्या काउंटरवर वटविले जातात अशी तक्रार गेले कांहीं महिने मुंबई-पुण्यांत ऐकूं येत होती. या दोन ठिकाणीं हा धंदा करणारांची एक टोळीच असल्याचें पोलिसांस आढळून आलें आहे. बँक ऑफ इंडियाच्या पुणें येथील कचेरींत एक चेक वटविला जात असतांना एकास पोलिसांनीं पकडलें व त्यानें दिलेल्या माहितीवरून मुंबईच्या गिरगांव पोष्टांतील सॉर्टिंग खात्यामधील दोघांस आतां अटक झाली आहे.

**हॉलिवुडमध्यें हिंदी चित्रपटांची निर्मिति**—हॉलिवुडच्या सिनेमा सृष्टींत हिंदी फिल्म्स निर्माण करून जगाच्या बाजारांत पाठविण्याचा प्रयत्न हिंदी सिनेमाच्या धंद्यांतील दोन प्रमुख तज्ज्ञ करीत आहेत. बोलपट हिंदी व इंग्लिश भाषेंतून घेण्यांत येणार असून ज्या हिंदी नटांना या दोन्ही भाषा येत असतील त्यांचीच निवड करण्यांत येणार आहे. अमेरिकेंत सिनेमाच्या धंद्यांतील तज्ज्ञांसाठी ' हुमायून ' नांवाची एक फिल्म नुकतीच न्यूयॉर्कमध्यें दाखविण्यांत आली.

**होजिअरीचे कारखाने आणि सूत**—हातमोजे, गंजीफ्रॉक वगैरे विणणाऱ्या होजिअरी कारखान्यांची यंत्रसामुग्री आयात करण्यासाठी बरेच परवाने मध्यवर्ती सरकारनें दिले आहेत. अजून ही सामुग्री आयात करण्यासाठी परवाने मागितले जात आहेत. तथापि या कारखान्यांत लागणारें सूत मिळेलच अशी हमी मध्यवर्ती सरकार घेऊं शकत नसल्याचा इषारा या कारखानदारांना देण्यांत आला आहे.

**प्राप्तीवरील कर चुकविणाऱ्यांना सूचना**— प्राप्तीवरील कर चुकविणाऱ्या लोकांच्या बाबतींत चौकशी करण्याचें काम सुरू करण्यापूर्वी या लोकांनीं आपणहून चुकविलेल्या करासंबंधीं पूर्ण माहिती देऊन कर-भरपाई केल्यास त्यांच्यावर फौजदारी खटले भरण्यांत येणार नाहींत, असें मध्यवर्ती सरकारनें जाहीर केलें आहे. या लोकांनीं आपल्या चुकारपणाबद्दलची माहिती १० जून १९४७ पूर्वी योग्य त्या अधिकाऱ्याकडे सादर करावयाची आहे.

**अमेरिकेंत तंबाखूचें वेडें पीक**—अमेरिकेंतील तंबाखू पिकविणाऱ्या ६ संस्थानांत उत्कृष्ट प्रकारची तंबाखू बेसुमार पिकली आहे. ब्रिटनमध्यें निर्यात होणाऱ्या तंबाखूंत २५ टक्के कपात झाल्यामुळें तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्यांत खळबळ उडाली आहे. गेल्या वर्षी ब्रिटननें आपल्याला लागणाऱ्या तंबाखूपैकीं ४८ टक्के तंबाखू अमेरिकेंतून आयात केली होती.

**९५ टन वजनाचा बॉयलर**—मुंबई स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या जलगोपाल आगबोटीचे बॉयलर जुने झाले आहेत त्यांचे ऐवजी नवे बसविण्यांत येत आहेत. ९५ टन वजनाचा मोठा बॉयलर गेल्या आठवड्यांत मुंबई बंदरांत उतरून घेण्यांत आला. गेल्या महायुद्धानंतर उतरून घेण्यांत आलेल्या सर्व बोजांत हा बोजा जड आहे.

**हिंदुस्थानला तांदूळ मिळणार**—हिंदुस्थान सरकारला आपल्या वॉशिंग्टन येथील प्रतिनिधीकडून मिळालेल्या माहिती प्रमाणें १९४७ च्या दुसऱ्या सहामाहीसाठी हिंदुस्थानला तांदुळाचा वांटा मिळणार आहे. १९४७ च्या पहिल्या सहामाहीसाठी ४ लाख, १० हजार टन तांदूळाचा वांटा मिळाला होता.

**सिलोनच्या चहासाठी इजिप्तची मागणी**—इजिप्तमध्यें सिलोन मधून येणाऱ्या चहाची आयात अधिक व्हावी म्हणून इजिप्तनें सिलोन सरकारकडे बोलणीं चालू केल्याचें समजतें.

**अमेरिकेन मंदी आणि चिनी कम्युनिस्ट**—अमेरिकेंत लवकरच प्रचंड आर्थिक मंदीची लाट उठून अमेरिका दरिद्री होईल, अशी अटकळ चिनी कम्युनिस्टांनीं बांधल्याचे चिनी सरकारच्या अमेरिकेंतील वकिलानें बोलून दाखविलें. चिनी कम्युनिस्ट महत्त्वाचीं लष्करी ठाणीं न लढतां सोडून देत आहेत. अमेरिकेंत मंदी आली म्हणजे तिला देशाच्या बाहेर फारशी हालचाल करता येणार नाहीं व मग गेलेलीं ठाणीं परत मिळवितां येतील असा त्यांचा अंदाज असल्याचेंहि या वकिलानें प्रगट केलें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २१ मे, १९४७





प्रा. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## बँकांच्या धंद्याविषयीं श्री. योधराज यांचे विचार

हिंदुस्थानांतील पांच मोठ्या बँकांपैकीं पंजाब नॅशनल बँक ही एक आहे. या बँकेच्या १०० व्या सर्वसाधारण सभेच्या प्रसंगानें बँकेचे अध्यक्ष आणि जनरल मॅनेजर श्री. योधराज यांनीं हिंदुस्थानांतील बँकांच्या धंद्याविषयीं आणि सर्वसाधारण चलनाच्या व पतीच्या व्यवहारासंबंधीं कांहीं महत्त्वाचे विचार प्रगट केले आहेत. बँकांच्या अध्यक्षांचीं मामुली भाषणें बहुधा बँकेच्या प्रगतीसंबंधीं माहिती देणारीं आणि भागीदारांना नफा वाटण्याची शिफारस करणारीं असतात. त्यामुळें बँकेशीं संबंधित व्यक्तींखेरीज इतरांना त्यांत लक्ष घालण्याचें सहसा कारण पडत नाहीं. श्री. योधराज यांचें भाषण त्यांच्या स्वतःच्या बँकेच्या कारभारासंबंधीं मर्यादित नसल्यामुळें, त्यांनीं उपस्थित केलेल्या मुद्यांचा बँकांच्या चालकांनीं, गिऱ्हाइकांनीं आणि पैशाच्या व्यवहाराच्या अभ्यासकांनीं विचार करणें जरूर आहे.

श्री. योधराज यांनीं आपल्या भाषणांत मुख्यतः खालील बाबींविषयीं विचार व्यक्त केले आहेत. ( १ ) बँकांचें शाखा उघडण्याबद्दलचें धोरण, ( २ ) बँकेच्या भागावरील नफ्यावर नियंत्रण, ( ३ ) बँकिंगच्या धंद्यांचें भवितव्य, त्याची इंग्लंड आणि अमेरिकेंतील बँकांच्या धंद्याशीं तुलना आणि ( ४ ) सरकारचें व रिझर्व बँकेचें चलनविषयक धोरण. या मुद्यांपैकीं तिसरा व चौथा मुद्दा हे विशेष महत्त्वाचे असून, विचाराच्या सोयीसाठी त्यांची चर्चा स्वतंत्रपणें केली, तरी ते परस्परांशीं इतके निगडित आहेत कीं एकाचा विचार करतांना नकळतच दुसऱ्यासंबंधीं चर्चा करणें अगर होणें अपरिहार्यच आहे. शिवाय या मुद्यांना देशाच्या सर्वसामान्य आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीनेंही दूरगामी महत्त्व आहे. राहिलेले मुद्दे कमी अधिक महत्त्वाचे असले तरी त्यामुळें देशाच्या आर्थिक परिस्थितीवर झपाट्यानें परिणाम घडून येण्यासारखे ते नाहींत. असो. हिंदुस्थानची औद्योगिक प्रगति झपाट्यानें घडवून आणण्यासाठी सवंग पैशाच्या धोरणाचा सरकारनें व रिझर्व्ह बँकेनें पाठपुरावा करावा याविषयीं बऱ्याच अर्थशास्त्राच्या तज्ज्ञांचें एकमत दिसून येतें. पण नुसतें एवढेंच म्हणून हा विषय सोडून देणें इष्ट ठरणार नाहीं. औद्योगिक प्रगति झपाट्यानें होण्यासाठी दीर्घ मुदतीचीं व कमी व्याजाचीं कर्जें मिळणें आवश्यक आहे. पण हिंदुस्थानांत इंग्लंड-अमेरिकेप्रमाणें भांडवल पुरवणाऱ्या संस्था नसल्यामुळें देशांतील व्यापारी बँकांवरच दीर्घ मुदतीचीं व छोट्या मुदतीचीं कर्जें पुरविण्याचा भार पडतो. श्री. योधराज यांनीं आपल्या भाषणांत या मुद्याचा प्रामुख्यानें उल्लेख केला असून सरकारच्या सवंग पैशाच्या धोरणामुळें सरकारला कमी व्याजाच्या दरानें कर्जें मिळत असलीं तरी उद्योगधंद्यांनीं भारी व्याजानेंच पैसे काढावे लागतात असें सांगितलें. व्यापारी बँकांना आपले पैसे दीर्घ मुदतीनें गुंतविणें धोक्याचें असल्यामुळें देशाच्या उद्योगधंद्यांना नवीन भांडवल उभारणें अर्थातच जड जात आहे. यासाठी सरकार काढीत असलेल्या क्रेडिट कॉर्पोरेशन सारख्या संस्थांचें श्री. योधराज यांनीं स्वागत केलें आहे. तथापि या संस्थेचें भांडवल अवघें ५ कोटी रु.असल्यामुळें ४० ते ५० कोटींपेक्षां अधिक भांडवल पुरविणें तिला शक्य होणार नाहीं असा इषाराही त्यांनीं देऊन ठेवला आहे. या परिस्थितीवर उपाय म्हणून रिझर्व्ह बँके-सारख्या मध्यवर्ती संस्थेच्या नियंत्रणाखालीं छोट्या मुदतीचीं कर्जें मिळण्याची सोय करावी; आणि त्याचबरोबर दीर्घ मुदतीचीं कर्जें देऊन उद्योगधंद्यांना भांडवलाचा पुरवठा करणाऱ्या संस्थाही निर्माण करण्यांत याव्या अशा दोन महत्त्वाच्या सूचना त्यांनीं केल्या आहेत. हिंदुस्थानची औद्योगिक प्रगति द्रुतगतीनें व्हावयाची असेल तर बँकांचे व्यवहार, चलनविषयक सरकारी धोरण आणि उद्योगधंद्यांची उभारणी या सर्वांचा विचार एकमुखी धोरणानें झाला पाहिजे हें उघड आहे. या विषयावर तपशीलवार उपाययोजनेसंबंधीं मतभेद होणें शक्य आहे. तथापि पतीचे व्यवहार, बँका आणि चलनविषयक धोरण हीं एका अगर अधिक मध्यवर्ती संस्थांतर्फे नियंत्रित रहावीं. याविषयीं दुमत होण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानची विभागणी होऊन या देशांत निरनिराळीं दोन किंवा तीन सार्वभौम राज्यें निर्माण झालीं तर सर्वच परिस्थिति आमूलाग्र बदलून जाईल. परंतु देशांतील राजकीय मध्यवर्ती संस्था अखंड राहिली तर वरील सूचनांचा विचार तिला करावाच लागेल.

## ब्रिटिश मालाची हिंदी बाजारपेठ

### डॉलर गटांतील देशांकडे निर्यात वाढविण्याची आवश्यकता

ग्रेट ब्रिटनच्या १९४६ मधील निर्गत व्यापाराची छाननी केली असतां, त्यांतील हिंदुस्थानाचें महत्त्व तात्काळ लक्ष्यांत येतें. १९३८ व १९४५ सालीं, ब्रिटनच्या परदेशी बाजारपेठांत दक्षिण आफ्रिकेचा अनुक्रम पहिला होता. परंतु, हिंदुस्थान आतां आपल्या तिसऱ्या अनुक्रमावरून सरकून पहिल्या अनुक्रमावर गेला आहे. १९४६ सालीं ग्रेट ब्रिटननें जितका माल निर्यात केला, त्याच्या ९% माल हिंदुस्थानानें घेतला. पैशांत त्याची किंमत सुमारें १२५ कोटि रुपये भरली. द. आफ्रिकेचा व ऑस्ट्रेलियाचा अनुक्रम दुसरा व तिसरा आला. डेन्मार्कचा अनुक्रम १९४५ सालीं २४ वा होता, तो आतां ४ था आला आहे. आयराचा पांचवा व अमेरिकेचा पांचवा अनुक्रम आहे. अमेरिकेनें १९४५ सालीं ग्रेट ब्रिटनचा ५५ कोटि रुपयांचा माल घेतला, परंतु ग्रेट ब्रिटनकडे ३५० कोटींचा माल पाठविला. म्हणजे, ग्रेट ब्रिटनची अमेरिकेंतील खरेदी अमेरिकेच्या ग्रेट ब्रिटनमधील खरेदीच्या सहा पट आहे! ग्रेट ब्रिटन–कॅनडा व्यापाराचीहि हीच परिस्थिति आहे. कॅनडानें ग्रेट ब्रिटनला ३०० कोटींचा माल धाडला तरी ग्रेट ब्रिट-नला आपला ५० कोटींचाहि माल कॅनडाकडे पाठविता आला नाहीं. ब्रिटिश निर्गतीचा तिसरा हिस्सा युरोपांतील देशांनीं उचलला. यांत फ्रान्स, डेन्मार्क, आयरा व हॉलंड हे देश प्रमुख आहेत. रशियाकडे ब्रिटिश निर्गत वाढत्या प्रमाणावर होत आहे. पूर्वी

आशियांतील देशांकडे अद्याप फारशी निर्गत होऊं लागलेली नाहीं.

ब्रिटिश आयात-निर्गत व्यापाराचा विचार करतांना, हा व्यापार डॉलर गटांतील देशांशीं होतो का पौंड स्टर्लिंग गटांतील देशांशीं होतो, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. डॉलर गटांतील देशांकडे जितकी ब्रिटिश निर्गत वाढेल तेवढी ब्रिटनला हवी आहे. १९४६ सालीं, डॉलर गटांतील देशांकडून ९३० कोटि रुपयांचा माल ग्रेट ब्रिटननें आयात केला परंतु त्यास फक्त २७० कोटि रुपयांचाच माल पुरविला. पौंड स्टर्लिंग गटांतील देशांनीं मात्र आपल्या निर्गतीपेक्षां जास्त किंमतीचा ब्रिटिश माल आयात केला. एकूण निर्गत वाढविण्याचें अगत्य ग्रेट ब्रिटनमध्यें एकसारखें प्रतिपादलें जात आहे. ही निर्गत डॉलर गटांतील देशांकडे कशी होईल हाहि त्यासंबंधांतील एक अवघड प्रश्न आहे.

## स्फुट विचार

### मध्यपूर्वेत ब्रिटनला रशिआची भीति

सध्यां पॅलेस्टाइनच्या प्रश्नाचा संयुक्त राष्ट्रसंघाच्या खास अधिवेशनामध्यें विचार चालू असून खरी परिस्थिति अजमावण्यासाठी एक कमिशनहि नेमण्यांत आलें आहे. पॅलेस्टाइनचा प्रश्न हा केवळ निमित्त असून मध्यपूर्वेत रशिआचें वजन वाढूं नये असा ब्रिटनचा हेतू असल्याचें ब्रिटिश नभोवाणी केंद्रावरून केल्या जाणाऱ्या ब्रिटनच्या परराष्ट्रीय धोरणाच्या प्रचारावरून दिसून येतें. डार्डनेल्स आणि बॉस्फरस या सामुद्रधुनीवर रशिआला नियंत्रणाचें हक्क मिळाल्यास तुर्कस्थान रशिआच्या कक्षेंत जाईल आणि मग ग्रीसलाहि रशिअन दडपणापुढें टिकाव धरतां येणार नाहीं अशी विचारसरणी या प्रचारांतून दिसून येतें. डार्डनेल्स सामुद्रधुनी व कॉन्स्टॅन्टिनोपल झारच्या रशिआला देण्याचा गुप्त तह पहिल्या महायुद्धाच्या आरंभीं झाला होता हें प्रसिद्धच आहे. तेव्हां झारच्या रशिआपेक्षां सध्याचा कम्युनिस्ट रशिया समाजवादी ब्रिटनला अधिक धोक्याचा वाटत आहे असें दिसतें. वरील विचारसरणी पुढें चालवून ब्रिटिश नभोवाणीवरून पुढीलप्रमाणें रशिअन वर्चस्वाचें चित्र रेखाटण्यांत येतें. तुर्कस्थान व ग्रीस रशिअन कक्षेंत गेल्यावर इटलीही तीच वाट चालू लागेल. कारण इटलींतील कम्युनिस्ट पक्ष वाढत आहे. इटलीची वाट लागल्यावर फ्रान्सचीही तीच गत होणार; फ्रान्समधील सर्व पक्षांत कम्युनिस्ट पक्ष अधिक संघटित आहे हें सर्वश्रुतच आहे. त्यानंतर म्हणजे स्पेन सोडून सर्व युरोप रशिआच्या छायेखालीं गेल्यावर स्पेनही युरोपकडे ओढला जाईल; आणि मग ब्रिटन एकाकी पडेल. या चित्रणांत सत्य किती आणि प्रचार किती हें काळच उघड करील. तथापि सध्याचें ब्रिटनचें मजूर सरकार आणि अमेरिकन सरकार यांची रशिआविरोधी एकजूट भूमध्य समुद्राबाबत दिसून येते, त्याच्या मागें रशिआची भीति उघडपणें दिसून येतें यांत मात्र शंका नाही.

### पे कमिशनच्या शिफारसी

मध्यवर्ती सरकारच्या नोकर वर्गाच्या पगारासंबंधीं तपशीलवार चौकशी करून सूचना करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें मे १९४६ मध्यें सर श्रीनिवास वरदाचारिअर ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नमलें होतें. श्री. न. वि. गाडगीळ व श्री. ना. म. जोशी हे आणखी पांचां बरोबर कमिशनचे सभासद होते. कमिशनच्या अहवालानें ४३६ पृष्ठें व्यापलीं असून,मुख्य मुद्यांवर सर्व सभासदांचें एकमत झालेलें आहे. युद्धापूर्वीच्या मानानें राहाणीच्या खर्चाचें मान ६० ते ७५% जास्त, ह्या पातळीवर येऊन राहील. ह्या अपेक्षेचे आधारावर कमिशननें आपल्या पगाराच्या शिफारसी केलेल्या आहेत. आजचा रहाणीचा खर्च विचारांत घेतां, कनिष्ट वर्गास महिना ५५ रुपये (३० रु. पगार + २५ रु. महागाई भत्ता) व मध्यम वर्गीयास ९० रुपये (५० रु. पगार + ३५ रु. महागाई भत्ता) मिळणें युक्त असल्याचा कमिशनचा अभिप्राय आहे. अधिकाऱ्यांचा कमाल पगार कांहीं विशिष्ट जागा सोडून २,००० रु. सुचविण्यांत आला आहे. कमिशनच्या शिफारसी मध्यवर्ती सरकारनें मान्य केल्या असून त्यामुळें सरकारी वार्षिक खर्च ३० कोटि रुपयांनीं वाढणार आहे. प्रांतिक सरकारांवर पे कमिशनच्या शिफारसी बंधनकारक नसल्या, तरी त्यांना मध्यवर्ती सरकारचें अनुकरण करणें क्रमप्राप्तच होईल आणि त्यामुळें त्यांचा खर्चहि वाढेल. करवाढ केल्याविना हा बोजा उचलला जाणें अशक्य आहे. सरकारी नोकरांना कमिशनच्या शिफारसी कितपत समाधानकारक वाटतील आणि त्यांच्या कामांत सुधारणा होऊन आर्थिक स्थैर्यास कितपत मदत होईल, हे प्रश्न वेगळेच आहेत.

### गिरणीमालकांची कैफियत

मुंबईच्या गिरणीमालक संघाची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरली होती. त्यावेळीं संघाचे अध्यक्ष श्री. धरमसी एम. खटाव, यांनीं आपल्या भाषणांत, गिरण्यांच्या भवितव्याबद्दल तीव्र निराशा व्यक्त केली. घटत जाणारें उत्पादन, वाढती मजुरी, चढता उत्पादन खर्च, उतरत्या किंमती आणि असमाधानी मजूरवर्ग, ह्या सर्व कारणांमुळें कापडाच्या धंद्याची स्थिति अत्यंत असमाधानकारक होत चालल्याचें त्यांनीं सांगितलें. उत्पादन वाढविण्याच्या आवश्यकतेची भाषा सरकारी जबाबदार अधिकारी बोलत असतांना, सरकारी धोरण मात्र उत्पादन घटण्यास कारणीभूत होत आहे अशी त्यांनीं तक्रार केली. कामाचे तास कमी केल्यामुळें उत्पादन कमी होऊं लागलें आहे, व त्यांतच मुंबई सरकारनें कांहीं गिरण्यांत चालू असलेली कामाची तिसरी पाळीहि बंद केली आहे. इकडे मध्यवर्ती सरकार तिसऱ्या पाळीस उत्तेजन देत आहेच! संप व हरताळ ह्यांचे दुष्परिणाम तर सुप्रसिध्दच आहेत. मुंबई सरकारच्या कामगारविषयक कायद्यांवर आणि धोरणावरहि श्री. खटाव ह्यांनीं कडक टीका केली. कामगारांना रहाण्यासाठी बिऱ्हाडें बांधून देण्याची जबाबदारी कारखानदार व गिरणीवाले ह्यांवर मुंबई सरकारनें टाकली असून त्यामुळें मालक वर्गाच्या पैशाचा विनियोग धंदा सुधारण्याकडे आतां न होतां अनेक कोटि रुपये विटा-मातींत अडकून पडतील असें सांगून ह्या प्रश्नाचा विचार प्रांतिक पेक्षां अखिल भारतीय पायावर केला जाणें अगत्याचें आहे असें त्यांनीं प्रतिपादलें. सरकारनें खासगी प्रयत्नांस उत्तेजन मिळावें असें धोरण पत्करावें, नाहींतर सर्व उद्योगधंद्यांचें राष्ट्रीकरण तरी करून टाकावें; परंतु सध्याची स्थिति धंद्यांच्या व उत्पादनाच्या वाढीस मुळीच पोषक नाहीं हें श्री. खटाव ह्यांच्या भाषणाचें सार आहे.

### पुण्यांतील बँकर्स क्लिअरिंग हाऊस ता. २८ रोजीं सुरू होणार

पुणें येथें बँकर्स क्लिअरिंग हाउसची स्थापना आतां झाली असून त्याच्या कामास ता. २८ रोजीं प्रारंभ होईल. पुण्यांतील शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांसच त्याचें सभासदत्व मर्यादित करण्यांत आले आहे. प्रत्येक सभासद् बँकेनें क्लिअरिंग हाऊसकडे ५० हजार रु. डिपॉझिट ठेवावयाचे आहे आणि खर्चासाठीं दरमहा २५ रु. द्यावयाचे आहेत. इंपीरिअल बँकेच्या पुणें (कँप) कचेरीकडे क्लिअरिंग हाउसची व्यवस्था राहील.

## कै. प्रो. वा. गो. काळे स्मारक निधीला देणग्या

### प्रत्येकीं १,००० रु. वर

सर दोराबजी टाटा ट्रस्ट, मुंबई ५,००० रु., प्रो. जी. आर. कोकीळ व सौ. गंगुताई कोकीळ, कोल्हापूर २,०००; दि बँक ऑफ महाराष्ट्र लि, पुणें, डायरेक्टर्स व स्टाफ १,५०० रु.; सर रतन टाटा ट्रस्ट मुंबई, १,५०० रु., दि बृहन् महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें, १,००१ रु.

### प्रत्येकीं १,००० रु.

श्री. सी. जी. आगाशे, पुणें, बॉबे प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँक लि., श्री. एम्. एल्. डहाणूकर मुंबई, श्री. जी. डब्ल्यू. देवधर, अहमदाबाद, सर. सी. डी. देशमुख, मुंबई, श्री. सी. जी. काळे, पुणें, मेसर्स किर्लोस्कर ब्रदर्स, किर्लोस्करवाडी, श्री. आर. जी. कुलकर्णी, पुणें, सर जनार्दन ए. मदन मुंबई, माधवनगर कॉटन मिल्स, बुधगांव, श्री. वैकुंठराय मेहता, मुंबई, श्री. एस्. पी. ओगले, ओगलेवाडी, मि. एफ्. डी. पद्मजी, पुणें, राजासाहेब ऑफ सांगली, श्री. आर. जी. सरय्या, मुंबई.

### प्रत्येकीं २०० रु. वर

पूना सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि. पुणें, ५०१ रु., राजासाहेब ऑफ मिरज, ५०० रु., प्रो. डी. आर. गाडगीळ, ३५० रु., न्या. एस्. व्ही. भिडे, इंदूर ३०० रु., श्री. जी. जी. दांडेकर, जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि. भिवंडी, २५१ रु., प्रि. डी. जी. कर्वे, पुणें, २५० रु., सोलापूर डिस्ट्रिक्ट कोऑपरेटिव्ह बँक लि., १०१ रु., सुरत डिस्ट्रिक्ट कोऑपरेटिव्ह बँक लि. २५० रु., श्री. व्ही. पी. वर्दे, मुंबई, २५० रु., श्री. व्ही. एस. भिडे, मुंबई, २०० रु.

### प्रत्येकीं १०१ रु.

अहमदाबाद सेंट्रल को. बँक लि., श्री. एल. बी. भोपटकर, पुणें, भुसावळ को. बँक लि., डेक्कन मर्चंटस को. बँक लि. मुंबई, सर चुनीलाल वी. मेहता, मुंबई, नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को. बँक लि. अहमदनगर, सर फाजल इब्राहिम रहिमतुल्ला, मुंबई, श्री. जी. आर. साठे, पुणें, श्री. बी. टी. ठाकूर, कलकत्ता, ईस्ट खानदेश सेंट्रल को. बँक जळगांव.

### प्रत्येकीं १०० रु.

श्री. एम्. एस. अणे, हाय कमिशनर सिलोन, प्रो. जे. जे. अंजारिया, मुंबई; बार्शी सेंट्रल को. बँक; बॉबे पोर्ट ट्रस्ट एम्प्लॉयीज को. क्रेडिट सोसायटी, मुंबई; भडोच को. बँक लि. भडोच; राजासाहेब ऑफ मिरज, (ज्यु) बुधगांव; प्रिं. व्ही. के. जोग आणि वाडिआ कॉलेजचे तहाहयात सदस्य, पुणें; श्री. आर. पी. पटवर्धन, पीपल्स को. बँक, सुरत; राजासाहेब ऑफ फलटण, फलटण; रत्नागिरी अर्बन को बँक, रत्नागिरी; श्री. मोहनलाल टॅनन, मुंबई;

### ९३ रु.

श्री. जी. डब्ल्यू. देवधर अहमदाबाद ह्यांचे मार्फत

### प्रत्येकीं ५१ रु.

बँक ऑफ औंध, औंध; डॉ. एच्. एल् डे, डाका; श्री. बी. के. मदन, मुंबई; सारस्वत को. बँक. लि. मुंबई; सरदार भिवंडीवाला पारडी पीपल्स को. बँक.

### प्रत्येकीं ५० रु.

प्रिं. जे. आर. घारपुरे; कऱ्हाड अर्बन को. बँक कऱ्हाड; सर. आर. पी. मसानी मुंबई; न्यू बँक ऑफ इंडिआ, लाहोर; डॉ. आर. पी. परांजपे, हाय कमिशनर ऑस्ट्रेलिया; प्रो. एस्. के. रुद्र अलाहाबाद.

श्री. आर. एल. फणसाळकर ३० रु.

### प्रत्येकीं २५ रु.

श्री. ए. आर. भट, पुणें; जंबुसार पीपल्स को. बँक, जंबुसार; श्री. सी. व्ही. जोशी, बडोदा; मेसर्स एस्. बी. जोशी अँड को, मुंबई; कलोल अर्बन को. बँक; श्री. आर. बी. पोतनीस.

प्रो. व्ही. व्ही. कामत पुणें, २१ रु; प्रिं. डी. एन्. भल्ला, लाहोर, २० रु; श्री. रामलाल भाटीआ, सोलापूर १० रु. २ आ.

### प्रत्येकीं १० रु.

श्री. जी. डब्ल्यू. देवधर. अहमदाबाद (मार्फत); प्रो. एन्. आर. देशपांडे, पुणें; श्री. के. बी. गजेंद्रगडकर, सातारा; श्री. आर. बी. घोरपडे, पुणें; श्री. वाय. जी. मोरे, राजमहेंद्री; प्रो. आर. एन्. जोशी, सांगली; श्री. आय. एन्. कपूर, लाहोर; श्री. परमानंद सिलनानी, कराची; प्रो. एस्. व्ही. कोगेकर, पुणें; पूना सिटी म्युनिसिपल सर्व्हंटस् को. अर्बन बँक, पुणें.

### प्रत्येकीं ५ रु.

प्रो. व्ही. ए. आपटे, पुणें; प्रो. व्ही. व्ही. आपटे, प्रो. एम्. जी. भाटे, पुणें; प्रो. जी. एल्. चंद्रात्रेय, पुणें; प्रो. एन्. जी. दामले, पुणें; प्रो. आर. एन्. दांडेकर, पुणें; प्रो. सी. आर. देवधर, पुणें; प्रो. डी. जी. ढवळे, पुणें; प्रो. व्ही. एन्. ढवळे, पुणें; डॉ. जी. एस्. महाजनी, पुणें; श्री. बी. एम्. काळे, पुणें; प्रो. आर. व्ही. ओतुरकर, पुणें; प्रो. एस्. आर. शर्मा, पुणें; प्रो. बी. बी. साठये, पुणें; प्रो. एस्. आर. पारसनीस, पुणें, प्रो. आर. पी. शिंत्रे, पुणें; प्रो. पी. एन्. वारकर, पुणें; प्रो. एम्. आर. ढेकणे, पुणें; प्रो. व्ही. जी. परांजपे, पुणें.

प्रो. आर. के. सांडेकर, २ रु.

---

**अमेरिकेची एक्स्पोर्ट इंपोर्ट बँक**—अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेची मुदत ३० जून १९४८ रोजीं संपते. ही मुदत पांच वर्षांनीं वाढविण्याचा विचार चालू आहे.

**जागतिक बँक**—जागतिक बँकेकडे आतांपर्यंत १६० कोटि डॉलर्स जमा झाले आहेत; त्यापैकीं ६४ कोटि डॉलर्स एकट्या अमेरिकेनें दिले आहेत. ४४ राष्ट्रांनीं बँकेचें सभासदत्व पत्करलें आहे.

**इव्हॅन्स फ्रेझर अँड कं. (इं.) लि.**—मेसर्स डी. एन. श्रॉफ अँड कं. लि. च्या मॅनेजिंग एजन्सीखालीं १ कोटि रु. भांडवलाची वरील कंपनी नोंदण्यांत आली आहे.

**पूर्व-युरोपांतील देशांचे व्यापारी करार**—सोफिआ येथें झेकोस्लोव्हाकिआ व बल्गेरिआ यांच्या दरम्यान एक व्यापारी करार नुकताच करण्यांत आला. हंगेरी आणि युगोस्लाव्हिआ यांची व्यापारी तहाची बोलणी वॉर्सा शहरीं चालू आहेत. पोलंडसाठी लांकूड, तेल इत्यादि मिळविण्यासाठी एक पोलिश शिष्टमंडळ रुमेनिआच्या राजधानीस आलें आहे. बल्गेरिया आणि युगोस्लाव्हिया यांचाहि १० लाख पौंड किंमतीच्या मालाची देवाण-घेवाण करणारा करार नुकताच झाला. अमेरिकेनें ग्रीसला व तुर्कस्थानला देऊं केलेल्या मदतीची प्रतिक्रिया म्हणून हे करार घडून येत आहेत, असें म्हणतात.

**टँगानिकांत नवें बंदर**—पूर्व आफ्रिकेंतील टँगानिका या ब्रिटिश वसाहतींत ब्रिटन एक मोठें बंदर बांधणार आहे. या बंदराला ४० लाख पौंड खर्च येणार असून तें २ वर्षांत पुरें होईल. या बंदरांत जगांतील सर्वांत मोठ्या बोटीसुद्धां नांगरतां येतील.

**आळशीचें तेल न वापरतां रंग**—ब्रिटिश शास्त्रज्ञांनीं पेट्रोलपासून रंग, प्लॅस्टिक्स्, कृत्रिम रबर व चामडें इत्यादि वस्तू तयार करण्याचे शोध लावले आहेत. आतांपर्यंत रंग तयार करतांना आळशीचें तेल ही एक अत्यावश्यक बाब होती; पण नवीन शोधामुळें आळशीच्या तेलाशिवायहि रंग तयार करतां येतील.

## प्राप्तीवरील कराचे नवे दर

३१ मार्च १९४७ रोजीं गव्हर्नर जनरलची मंजुरी मिळालेल्या इंडियन फिनॅन्स ॲक्ट १९४७ मध्यें प्राप्तीवरील कराचे दर पुढीलप्रमाणें दिले आहेत.

### इन्कम टॅक्स

( अ ) प्रत्येक व्यक्ति, अविभक्त हिंदु कुटुंब, न नोंदलेली पेढी वा अन्य संस्था.

२,५०० रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न नसल्यास त्याला प्राप्तीवरील कर अजिबात नाहीं. २,५०० रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असल्यास

| उत्पन्न | दर ( रुपयांत किती आणे ) |
|---|---|
| ( १ ) पहिले १,५०० रुपये | कर नाहीं |
| ( २ ) त्यानंतरचे ३,५०० रुपये | १ |
| ( ३ ) त्यानंतरचे ५,००० रुपये | २ |
| ( ४ ) त्यानंतरचे ५,००० रुपये | ३½ |
| ( ५ ) त्यानंतरच्या अधिक उत्पन्नावर | ५ |
| ( ब ) लिमिटेड कंपन्यांच्या सर्व नफ्यावर | ५ |

### सुपर टॅक्स

( अ ) प्रत्येक व्यक्ति, अविभक्त हिंदु कुटुंब, न नोंदलेली पेढी वा अन्य संस्था

| उत्पन्न | | दर ( रुपयांत किती आणे ) स्वसंपादित उत्पन्नावर | अन्य उत्पन्नावर |
|---|---|---|---|
| पहिल्या २५,००० रुपयांवर | | कर नाहीं | कर नाहीं |
| त्यापुढील ५,००० रुपयांवर | | २ | ३ |
| त्यापुढील ५,००० | " | २½ | ३½ |
| त्यापुढील १०,००० | " | ३ | ४ |
| त्यापुढील १०,००० | " | ४ | ५ |
| त्यापुढील १०,००० | " | ५ | ६ |
| त्यापुढील १०,००० | " | ६ | ७ |
| त्यापुढील १५,००० | " | ७ | ८ |
| त्यापुढील १५,००० | " | ८ | ९ |
| त्यापुढील १५,००० | " | ९ | १० |
| त्यापुढील ३०,००० | " | १० | १०½ |
| त्यानंतरच्या बाकीच्या उत्पन्नावर | | १०½ | १०½ |

( ब ) लोकल ॲथॉरिटींचे बाबतींत सर्व उत्पन्नावर प्रत्येक रुपयांत २ आणे.

( क ) सहकारी संस्थांचे बाबतींत.

पहिल्या २५,००० रुपयांवर कर नाहीं.

त्यानंतरच्या उर्वरित उत्पन्नावर रुपयांत २ आणे.

( ड ) लिमिटेड कंपन्यांचे बाबतींत

सर्व उत्पन्नावर रुपयांत २ आणे

आणि नव्यानें लादलेला जादा सुपरटॅक्स

**बँकांतील ठेवींच्या फेडीचा विमा**—ज्या बँकेचा विमा उतरलेला आहे, अशा एकाहि अमेरिकन बँकेच्या ठेवींदाराची ठेव गेल्या तीन वर्षांत बुडालेली नाहीं, असें यु. स्टे. फेडरल डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें जाहीर केलें आहे. ही कॉर्पोरेशन बँकांतील ठेवींचा विमा उतरते आणि अशा बँका ठेवीदारांच्या ठेवी देऊं शकल्या नाहींत तर त्यांची भरपाई ती स्वतः करते. कमाल ५,००० डॉलर्स पर्यंतच्या रकमेची जबाबदारी ती अशा रीतीनें स्वीकारते. प्रस्तुत कॉर्पोरेशनची स्थापना १९३४ सालीं झाली असून तिनें १३,००० बँकांच्या ठेवींस आपलें संरक्षण छत्र दिलें आहे.


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : ७ सप्टेंबर, १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| खपलेलें भांडवल | : | २,००,००,००० रु. |
| वसूल झालेलें भांडवल : | | १,५०,००,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | : | २,००,००,००० रु. |

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

—शाखा—

| | | |
|---|---|---|
| अहमदाबाद | काळबादेवी | कराची |
| भद्र (मुख्य ऑफिस) | मलबार हिल | मद्रास |
| एलिस ब्रिज | कलकत्ता | नागपूर |
| माणेक चौक | क्लाईव्ह स्ट्रीट | किंग्जवे |
| स्टेशन ब्रँच | (मुख्य ऑफिस) | इतवारी बझार |
| अमृतसर | बडा बझार | पुणें |
| अंधेरी (मुंबई शेजारीं) | चौरंगी स्क्वेअर | पुणें शहर |
| वांद्रे ( मुंबई शेजारीं ) | कालिकत | पालनपूर |
| भुज ( कच्छ ) | कोइमतूर | राजकोट |
| मुंबई | हैद्राबाद ( सिंध ) | सोलापूर |
| बुलियन एक्सचेंज | जमशेदपूर | सुरत |
| कुलाबा | जुनागड | वेरावळ |

लंडन शाखा : १७, मूर गेट, लंडन ई. सी. २

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

तपशीलासाठी चौकशी करा.

बी. एन. अटल, एजंट, पुणें

ए. सी. क्लार्क, जनरल मॅनेजर



# कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड

डिस्टिलरी लवकरच सुरू होणार

## ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

६% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स विकणें आहेत.

—संचालक मंडळ—

रावबहादुर व्ही. व्ही. यारगोप, बी.ए., एलएल. बी., दिवाण, मिरज ज्यूनिअर स्टेट; श्री. डी. व्ही. गर्दे, बी. ए., एलएल. बी., डिस्ट्रिक्ट जज्ज व हुजूर चिटणीस, मिरज ज्यूनियर स्टेट; श्री. एस. एस. निसळ, अहमदनगर; श्री. एन. एस. गोडबोले, पुणें; श्री. के. बी. देसाई, कोल्हापूर; सरदार व्ही. बी. महागांवकर, कोल्हापूर; राजा बी. एल. सरदेसाई, वंटमुरी; दिवाणबहादुर एस. डी. मानवी, गदग; श्री. एस. जी. मराठे, बी.ई., पुणें; श्री. बी. बी. पोतदार, बी.ए., एलएल.बी., बेळगांव; सरदार के. आर. विंचूरकर, ( एक्स-ऑफिशिओ ) पुणें. अधिक माहितीसाठी लिहा—

कृष्णा-कित्तूर, जिल्हा बेळगांव. | विंचूरकर आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस्.

### किर्लोस्कर ऑइल इंजिन्स लि. पुणें

हिंदुस्थानांत ऑइल इंजनें उत्पादन करण्यासाठीं करील कंपनी मे. किर्लोस्कर सन्स आणि कं. नें स्थापन केली, तिच्या कामास २२ नोव्हेंबर १९४६ रोजीं प्रारंभ झाला. ऑइल इंजिनांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन हातीं घेण्यांत कंपनीनें ब्रिटिश ऑइल इंजिन्स (एक्सपोर्ट) लि. ह्या सुप्रसिद्ध व मोठ्या ब्रिटिश कंपनीचें सहकार्य मिळविलेलें आहे. ५ ते ३०० अश्वशक्तीचीं इंजिनें कंपनी तयार करणार आहे. कंपनीनें विक्रीस काढलेलें २५ लक्ष रुपयांचें सर्व भांडवल खपलें आहे व मागणी केलेल्या १५ लक्ष रुपयांपैकीं १४ लक्ष, १० हजार रु. प्रत्यक्ष वसूल झालेले आहेत. सुमारें ८ लक्ष रुपये किंमतीच्या यंत्रसामुग्रीची ऑर्डर कंपनीनें दिली असून त्यापैकी सुमारें २ लक्ष रुपयांची यंत्रसामुग्री प्रत्यक्ष हातीं आली आहे. कंपनीनें सरकारकडून खडकी येथील ५५ एकर जागा अक्वायर करून मागितली, त्यापैकी ३२ एकरांचा ताबा मिळण्याबाबत हुकूम झालेला आहे. उरलेल्या जमिनीचाहि ताबा मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे. ह्या खातीं सुमारें ३ लक्ष रुपये ताळेबंदांत दिसत आहेत. कारखान्याच्या बांधकामास लवकरच प्रारंभ होणार आहे. ३१ मार्च १९४७ अखेर जमेपेक्षा आधिक झालेला सुमारें ३४ हजारांचा खर्च "कारखाना उभारणी काळांतील खर्च" खातीं दाखविण्यांत आला आहे. कारखाना अद्याप चालू झालेला नाहीं, ह्यासाठी मॅनेजिंग एजंट्सनी आपल्या ऑफिस अलावन्सपैकी कांहींहि रक्कम घेतली नाहीं, त्याचप्रमाणें जनरल मॅनेजर श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांनीहि आपल्या मासिक वेतनापैकी निम्मेंच वेतन घेतलें आहे. ह्याचा डायरेक्टरांनीं कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे. कंपनीची स्टॅच्युटरी सभा व पहिली वार्षिक सभा १७ मे रोजीं पुणें येथें झाली.

**ब्रिटन, अमेरिकन कर्ज झपाट्यानें संपवीत आहे**—गेल्या वर्षीच्या जूनमध्यें अमेरिकेनें ब्रिटनला दिलेल्या कर्जांतून ब्रिटन झपाट्यानें रकमा काढीत आहे; आतांपर्यंत ब्रिटननें १ अब्ज, ५५ कोटी डॉलर्स काढले आहेत. एप्रिल १९४७ च्या प्रारंभीं ब्रिटननें २० कोटी डॉलर्स काढले. अमेरिकेंतील वाढत्या किंमतीमुळें-विशेषतः अन्नधान्याच्या वाढत्या किंमतीमुळें—ब्रिटन कर्जांतून अधिक झपाट्यानें रकमा काढीत आहे, असा अमेरिकेच्या सरकारी गोटांतील अभिप्राय आहे.

### बेपत्ता झाल्यामुळें समजला जाणारा मृत्यू

एकादा इसम सुमारें सात वर्षांपेक्षा आधिक काळ बेपत्ता झालेला असल्यास व सामान्यतः त्याचा पत्ता ज्या मंडळींना माहीत असावयास पाहिजे त्यांनाहि तो या मुदतींत लागला नसल्यास सदर मनुष्य मृत समजण्यांत यावा असा कायदा सर्व देशांत प्रचलित असतो. कांहीं विमा कंपन्या ह्या कायद्यास बगल देणारीं कलमें विमा करारांत समाविष्ट करून विमा पॉलिसी देत असतात. अशीच एक विमा पॉलिसी अमेरिकेंतील एका गृहस्थास देण्यांत आली होती. बेपत्ता होण्यापूर्वीं सुमारें एक वर्ष सदर विमेदार आपल्या बायकोपासून वेगळा रहात असे. तो बेसुमार दारू पिई, तें त्याचे बायकोला आवडत नसे. परंतु आपल्या चौघा मुलांवर त्याचें फार प्रेम होतें. विभक्त रहात असतांनाहि वरचेवर तो आपल्या मुलांना भेटावयास जात असे. तो नाहींसा झाल्यावर त्याच्या बायकोनें पोलिसांस वर्दी दिली व अन्य प्रकारेंहि त्याचा तपास लावण्याचे खूप प्रयत्न केले. पण ते व्यर्थ गेले. तरी सुद्धा पुढें आठ वर्षें ती विमा हप्ते भरीत होती. तदनंतर तिनें कंपनीकडे विम्याच्या रकमेची मागणी केली. कंपनी वरील कलमाची सबब सांगून रक्कम देईना. परंतु ओहिओ कोर्ट ऑफ अपील्सनें निकाल दिला कीं करारांतील सदर कलम कायद्याविरुद्ध असून कंपनीला त्याचा फायदा घेतां येणार नाहीं व म्हणून कंपनीनें विमेदाराच्या वारसदार पत्नीस विमारक्कम दिली पाहिजे.

**आतां कृत्रिम लांकूडही होऊं लागलें**—कृत्रिम रेझिन आणि कागद यांच्यापासून कृत्रिम लांकूड तयार करण्यांत आलें आहे. या लांकडांत नैसर्गिक लाकडाचे सर्व गुण असून तें अत्यंत हलकें असतें. कडक उन्हाळा अगर थंडी याचा त्याच्यावर कांहीं परिणाम होत नाहीं. जहाजांतील लाकूड काम, भिंतींत बांधलेलीं कपाटें, वगैरेसाठीं याचा चांगला उपयोग होईल असें म्हणतात. या लाकडाला 'होलो प्लास्ट' असें नांव देण्यांत आलें आहे.

**समुद्रांतील लव्हाळ्यापासून घरें**—सिमेंट कारखान्यांतील कोळशाच्या भट्टींतील राख आणि समुद्रांतील लव्हाळा यांचा उपयोग करून एक प्रकारचे कठीण बोर्डस् ऑस्ट्रेलिआंत बनविण्यांत आले आहेत. या बोर्डांचा उपयोग इमारतीच्या भिंतीसारखा करतां येत असल्यानें ऑस्ट्रेलिआंत त्याचे कारखाने निघणार आहेत.

★ कौटुंबिक आनंद ! ★
—कुटुंबाची भविष्यकाळची योग्य तरतूद केल्यानेंच हा आनंद उपभोगतां येतो.—

वेस्टर्न इंडिया

कंपनीची फायदेशीर विमा योजना पसंत करून ही तरतूद करून ठेवा.
सर्वांना पसंत अशा योजना आहेत.
माहितीसाठीं लिहा अथवा भेटा.
—मॅनेजर:—
वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.,
सातारा.
पुणें शाखा कचेरी:—कर्वे वाडा, लक्ष्मी पथ, बेलबाग.

## शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., पुणें ५ )

मागच्या सोमवारपासून टाटा डिफर्ड २१८० पासून शुक्रवारीं १९३५ पर्यंत उतरला. या सर्व आठवड्यांत विशेषतः याच शेअरवर वेचाणीचा जोर होता, तर याचा धाकटा भाऊ ऑर्डिनरी हा तुलनेनें जास्त प्रतिकारशक्ति दाखवत होता. पोलादाच्या शेअरवर येवढा आघात होण्याला कारणपरंपरा झाली, ती अशीः (१) टाटाच्या कारखान्यांत कामकऱ्यांत व अधिकारीवर्गांत वितुष्ट येऊन बाचाबाची झाली. (२) कोळसाखाणींतील कामगारांच्या वेतनांत बरीच वाढ करण्यांत आली याचा परिणाम टाटाच्या उत्पादनाचा खर्च वाढणार. (३) पे कमिशननें तीस कोटी रुपयेपर्यंत सरकारी नोकरांच्या पगारांत वाढ केल्यानें पुढें आणखी कर येण्याचा संभव. (४) यंदाचे टाटाचें व्याज कमी होणार, ही भीति. यामुळें मोठाले सटोडिये स्टील शेअर्स विकून टाकत होते व त्याच्या मागोमाग गिरण्याही खाली गेल्या. या शिवाय स्टर्लिंग शिलकांत कपात करण्याचें धोरण अधिकृतरीत्या ब्रिटिश अर्थमंत्री डॉ. डाल्टन यांनीं जाहीर केल्यानें लवकरच चलनसंकोच सुरू होणार अशी धास्ती बाजाराला वाटत आहे. इकडे राजकीय परिस्थिति कमालीची घोटाळ्याची होऊन बसलेली आहे. ब्रिटिश सरकारनें दोन जूनला आपला निर्णय देण्याचें ठरविलें आहे. तो खात्रीनें एक पक्ष अमान्य करणारच आणि दंगेधोपे चालूच राहणार काय? या एकंदर निराशाजनक आणि पैशाच्या तंगीच्या वातावरणांत बाजारांत कुणालाही उत्साह तर नाहींच उलट घबराट मात्र वाढत आहे. तेव्हां भाव एकसारखे खाली चालले आहेत. इतकें सगळें झालें तरी आम्हांला चालू भावांत निवडक शेअर्स, टाटा ऑर्डिनरी, गोकाक सिमेंट, पेलपूर, बर्मा हे गुंतवणूक आणि थोडा सट्टा म्हणून घेण्यास योग्य आहेत असें वाटतें. डिफर्डची गोष्ट अशी आहे कीं जर टाटाचें डिव्हिडंड कमी झालें तर तें ऑर्डिनरीच्या मानानें व्यस्त प्रमाणांत कमी येण्याचा संभव आहे, अथवा वाढलें तर व्यस्त प्रमाणांत वाढेलही. म्हणून डिफर्डचे फेरफार वेडे वांकडे होत राहतील. एरवी सध्यांच्या भावांत डिफर्डमध्यें सतराशे रुपये घट आल्यानंतरही हा शेअर टाकाऊ ठरवणें बुद्धीला पटत नाहीं.


### उतरत्या उत्पादनाचे कांहीं आकडे

मुंबईमधील गिरण्यांचें उत्पादन कसें घटलें आहे, हें खालील आकडे दर्शवितील.

| | कापड, कोटी वार |
|---|---|
| १९४४-४५ | १६५ |
| १९४५-४६ | १५९ |
| १९४६-४७ ( ११ महिने ) | १२० |

१९४५ सालांतील एकूण संप ४० भरले, तर त्यांची संख्या १९४६ मध्यें १०६ झाली, आणि वाया गेलेल्या कामाच्या तासांची संख्या ६¾ लाखांवरून १२¾ लाखांवर गेली. हरताळांची संख्याहि २८ ची ८५ झाली. संप आणि हरताळ ह्या दोन कारणांमुळें १९४५ सालीं ३¾ कोटि वार कापड कमी निघालें; १९४६ सालीं ही तूट ११ कोटि वार कापडावर गेली. गैरहजेरी वगैरे इतर कारणांमुळें झालेली घट ही वेगळीच.

**ब्रिटनच्या राष्ट्रीय उत्पन्नांत घट**— १९४५ सालाचे मानानें ब्रिटनचें राष्ट्रीय उत्पन्न ४·४ टक्क्यांनीं घटलें आहे. १९४५ सालीं राष्ट्रीय उत्पन्न ८ अब्ज, ३४ कोटी पौंड होतें, तें १९४६ सालीं ७ अब्ज, ९७ कोटी, ४० लाख पौंडावर आलें. अमेरिकेच्या राष्ट्रीय उत्पन्नांत मात्र १९४६ सालीं २ टक्क्यांनीं वाढ झाली आहे.






साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादनशक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी

प्रेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## मुंबई शेअर बाजार

**व्याज-वजा**

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

+ नागपूर रु. ६ दि. १९।५।४७

**साप्ताहिक बंद भाव**

स्वदेशी रु. २७ दि. २८।५।४७

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित § अंतिम | व्याज केव्हा मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १३।५।४७ | बुधवार १४।५।४७ | गुरुवार १५।५।४७ | शुक्रवार १६।५।४७ | सोमवार १९।५।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| [illegible]; २९२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २०१५ | २०५२—८ | २००५ | १९९५ | १९७० |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३८४ | ३९१ | ३८४—८ | ३८० | ३८२—८ |
| [illegible] ३६-४ | ०-८-०§ | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २५—६ | २५-१२ | २५—६ | २४-१२ | २३—६ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०§ | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३३—४ | ३३-१२ | ३२-१२ | ३१-१४ | ३१—२ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| १२००-८; २१३९-८ | ४०-०-०§ | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १०३० | १०५६—४ | १०४५ | १०१० | १०१५—० |
| ९१८०; ६५८ | १३-०-०§ | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६६५ | ६७९ | ६६१ | ६५१ | ६५१—० |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५९७ | ६१४ | ६०८ | ५९६ | ६१६—० |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | २७५ | २८० | २७८ | २७५ | २७९+ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३०४ | ३०५ | ३०१ | २९४ | २९४ |
| ५७१; ३२३ | १२-०-०§ | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९६ | २९८ | २९५ | २९३ | २९४ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३०९ | ३१६ | ३११ | ३०८ | |
| [illegible]-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४—३ | ४—२—६ | ४—१—९ | ३-१५—६ | ३-१४—६ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १५—४ | १५—६ | १५—६ | १५—३ | १५—३ |
| ४-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३—१ | ३—०—६ | २-१५—६ | २-१४—६ | २-१३—६ |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५०० | ५१७—८ | ५२२—८ | ५२२—८ | ५२०—० |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १७४ | १७५ | १७४—८ | १७३ | १७४ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २५२ | २५३ | २५२ | २५० | २५२ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४५० | ४५० | ४४२—८ | ४१६—४ | ४४२—८ |
| ४०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३०-१० | ३०-१४ | ३०—७ | ३०—६ | ३०—६ |

### अज्ञानांतला आनंद लाभला नाहीं.

एका विमेदारानें अपघाताबाबत दोन विमे उतरले होते. एक त्यानें आपल्या आईस नियुक्त ( असाइन ) करून ठेवला होता, व दुसरा आपल्या मिळकतीस नियुक्त केला होता. तो ११।१२।४१ रोजीं बंदुकीची गोळी लागून मरण पावला. मिळकतीस नियुक्त केलेल्या विम्यासंबंधीं कागदपत्र व पुरावे हजर करून विमा रक्कम मिळविण्यांत आली. परंतु मयताच्या आईला दुसऱ्या विम्याची कांहींच कल्पना नव्हती, व त्याच्या अस्तित्वासंबंधी ती पूर्णपणें अज्ञानांत होती. २२।२।४३ रोजीं कागदपत्र चाळीत असतां तिला तो दुसरा विमा आढळून आला व १९।३।४३ रोजीं त्याचेसंबंधीं पुरावे तिनें हजर केले. वास्तविक अपघातासंबंधीं पुरावा मृत्यूनंतर ९० दिवसांचे आंत हजर करावा अशी विम्याची एक अट होती परंतु पहिल्या विम्याचे बाबत सदर मृत्यू अपघाती होता ही गोष्ट शाबीत झालेली होती. त्यामुळें या मुद्याचा निर्णय महत्त्वाचा नव्हता. परंतु विम्याची आणखी एक अट अशी होती कीं, कंपनीचा निर्णय अमान्य झाल्यास व तो फिरवून घेण्यासाठी दावा करणें असेल तर, तो पुरावा दाखविण्यासाठी दिलेली ९० दिवसांची मुदत संपल्यापासून दोन वर्षांच्या आंत करावा, आणि विमेदाराच्या वारसदार आईनें तर सदर मुदत संपून पांच महिने लोटल्यावर सप्टेंबर १९४४ मध्यें दावा लावला होता. आईचे म्हणणें असें होतें कीं हा दुसरा विमा असल्याची वा तो नियुक्त करून दिला असल्याची कांहींच माहिती तिला नव्हती. परंतु अशा सबबीवर दावा मंजूर केल्यानें विमाकंपन्यांवर फार प्रचंड अशी जबाबदारी टेवली जाते. विम्याची माहिती नसल्यामुळें विम्याच्या अटी पाळल्या गेल्या नाहींत ही सबब सयुक्तिक मानली तर मग असे दावे केव्हां हवे तेव्हां आणतां येतील. कोर्टाच्या मतानें आपल्या दोन्ही विम्यांची माहिती आपल्या नियोजित वारसांना देऊन ठेवणें व तत्संबंधीं विमापत्रकें वारसांच्या हाताला सहजपणें लागावींत अशा रीतीनें ठेवणें हें विमेदाराचें कर्तव्य होतें. शिवाय विमापत्रक सांपडल्यानंतरहि वारसदारांना दावा करण्यास भरपूर अवधि होता. परंतु मयताच्या आईनें तरीसुद्धां ह्या मुदतींत दावा केला नाहीं. म्हणून तिचा दावा रद्द करणें कोर्टास भाग पडलें.

### सत्कार समारंभ.

वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कं. च्या पुणें येथील एजंटांतर्फे कंपनीचे मॅनेजर श्री. कृ. य. जोशी यांनीं एफ्. आय्. ए. ही बहुमानाची पदवी मिळविल्याबद्दल, रविवार तारीख १८ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां कंपनीचे चेअरमन डॉ. आगाशे यांचे अध्यक्षतेखालीं त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्या प्रसंगीं डॉ. आगाशे ह्यांनीं श्री.जोशी ह्यांच्या कंपनीमधील कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख केला. श्री. न. वि. गाडगीळ ह्यांच्या भाषणानंतर एजंटांमार्फत श्री. जोशी यांना चांदीची ताटवाटी दिल्यावर येथील शाखेचे सेक्रेटरी श्री. बाबूराव खांडेकर यांनीं सर्वांचे आभार मानले.

**इंडिया युनायटेड मिल्स लि.**—वरील कंपनीस १९४५ सालीं २ कोटि, ६ लक्ष रु. नफा झाला होता तो १९४६ सालीं १ कोटि, २१ लक्ष रुपयांवर आला. म्हणजे, नफ्यांत ४१% घट झाली. कंपनीनें ९ कोटि, २६लक्ष रुपयांची विक्री केली. म्हणजे, ती पूर्वीच्या वर्षीच्या मानानें १ कोटि, ३५ लक्ष रुपयांनीं कमी झाली. खर्चाचें प्रमाण त्या मानानें उतरलें नाहीं. १९४५ च्या मानानें कराची तरतूद ७१ लाखांनीं कमी करूनहि कंपनीला आपलें डिव्हिडंड ९$\frac{3}{8}$% चें ८·६% करावें लागलें आहे.

शाळाखात्याची मान्यता मिळालेलें

**पूना कमर्शिअल हायस्कूल**

एस. एल. सी. परीक्षेचा कोर्स, जमाखर्च, टाईपरायटिंग, शॉर्टहँड इत्यादि विषय. इंग्रजी ३ री व ४ थी पास झालेल्या विद्यार्थ्यांस अनुक्रमें ४ थी व ५ वीमध्यें प्रवेश. होतकरू व गरीब विद्यार्थ्यांसाठीं शिष्यवृत्त्या आहेत. वर्ग जूनपासून सुरू.

मुख्याध्यापक

पत्ताः—२५७ क, बुधवार पेठ, फरासखान्याच्या हौदासमोर, पुणें २










श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.